Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | शुक्रवार
१५.०५.२०२६

वरुड दर्पण

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १०४ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### भरधाव कार पिकअपला धडकली, कारचा चक्काचूर : ८ गंभीर जखमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** - पुण्याच्या मुळशी तालुक्यातील पौडजवळ मध्यरात्री भरधाव कारची उभ्या पीक अप गाडीला धडक बसून भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात कारमधील ८ जण गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार रात्री उशिरा पुणे-कोलाड महामार्गावर ही घटना घडली आहे. पौडच्या विठ्ठलवाडी फाटा परिसरात तरकारी माल घेऊन रस्त्याच्या कडेला पीक अप गाडी उभी होती. त्या गाडीला एका लाल रंगाच्या गाडीने अतिशय वेगात धडक दिली. यामध्ये कारचे मोठे नुकसान झाले असून कारमधील प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत.

# ...तर पेट्रोल-डिझेलचे दर तिप्पट वाढले असते?

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - अमेरिका आणि इराणमधील वाढत्या तणावाचा परिणाम आता थेट सर्वसामान्यांच्या खिशावर होताना दिसत आहे.

जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमती भडकल्या असून भारतातही शुक्रवारी (१५ मे) पेट्रोल आणि डिझेलच्या दरात मोठी वाढ करण्यात आली आहे. मात्र, सरकारने वेळीच हस्तक्षेप केला नसता, तर हे दर आजच्या तुलनेत दोन ते तीन पटीने जास्त असते, अशी माहिती समोर आली आहे. राजधानी दिल्लीत पेट्रोलच्या किमतीत ३.१४ रुपयांची वाढ होऊन ते ९७.७७ रुपये प्रति लिटरवर पोहोचले आहे.

तर डिझेल ३.११ रुपयांनी महागून ९०.६७ रुपये प्रति लिटर झाले आहे. यासोबतच सीएनजीच्या दरातही प्रति किलो २ रुपयांची वाढ करण्यात आली असून, आता दिल्लीत सीएनजी ७९.९० रुपये प्रति किलो दराने मिळणार आहे. तर मुंबईत पेट्रोलचे दर १०६.५४ प्रति लिटर झाले आहे. इंधन दरवाढीमागचे 'हे' आहे खरं कारण मिळालेल्या माहितीनुसार, जागतिक संकटामुळे तेल कंपन्यांना दररोज सुमारे १,००० कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. ग्राहकांना दिलासा देण्यासाठी तेल कंपन्या स्वतःच्या खिशातून पेट्रोलवर २६ रुपये आणि डिझेलवर तब्बल ८२ रुपये प्रति लिटरचा भार उचलत आहेत. याशिवाय, केंद्र सरकारने यापूर्वीच पेट्रोलवर ८ रुपये आणि डिझेलवर ६ रुपये उत्पादन शुल्क कमी केले आहे. जर हा आधार नसता, तर पेट्रोल-डिझेलचे दर आवाक्याबाहेर गेले असते, ज्यामुळे शेतकरी आणि वाहतूक क्षेत्र पूर्णपणे कोलमडले असते. खत आणि रेशनिंगची स्थिती इंधनासोबतच सरकारने शेतकऱ्यांनाही मोठा दिलासा दिला आहे. बाजारात २,२०० रुपयांना मिळणारी खताची गोणी शेतकऱ्यांना केवळ २४२ रुपयांत उपलब्ध करून दिली जात असून उर्वरित रक्कम सरकार अनुदान म्हणून भरत आहे. जगातील सुमारे ८२ देशांमध्ये सध्या इंधनाचे रेशनिंग (मर्यादित पुरवठा) सुरू आहे. आग्नेय आशियात तेलाच्या किमती ५० टक्क्यांनी, तर युरोपमध्ये २० टक्क्यांनी वाढल्या आहेत, मात्र भारताने अद्याप ही परिस्थिती नियंत्रणात ठेवली आहे.

### इंधन दरवाढीमागचे 'हे' आहे खरं कारण!




# साताऱ्यातून मुख्यमंत्री फडणवीस यांची मोठी घोषणा : पुढील वर्षी १५ लाख घरांचे वितरण

## कर्जमाफी, शेतकरी मदत आणि 'लखपती दीदी' अभियानालाही वेग देणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**सातारा** - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने प्रधानमंत्री आवास योजनेत विक्रमी कामगिरी केली असून, एका वर्षात तब्बल पाच लाख घरे पूर्ण करून लाभार्थ्यांना चाव्यांचे वितरण करण्यात आले आहे. पुढील वर्षी आणखी १५ लाख घरांचे वितरण करण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारने ठेवले असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

सातारा येथील सैनिक स्कूल मैदानावर आयोजित घरकुल वितरण सोहळ्यात ते बोलत होते. केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले , खासदार उदयनराजे भोसले माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉक्टर अतुल भोसले कराड उत्तरचे आमदार मनोज घोरपडे कोरेगावचे आमदार महेश शिंदे सातारा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रियाताई शिंदे उपाध्यक्ष राजू भोसले ग्रामविकास विभागा चे अप्पर सचिव चंद्रकांत पुलकुंडवार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशिनी नागराजन यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, २०१६ ते २०२२ या कालावधीत केंद्र सरकारच्या माध्यमातून राज्याला १२ लाख ९० हजार घरांचे उद्दिष्ट मिळाले होते. त्यानंतर नव्याने अनेक गरजू कुटुंबांची नावे समोर आल्याने आणखी ३० लाख घरांची गरज निर्माण झाली. त्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करण्यात आला असून, पुढील दोन ते तीन वर्षांत मोठ्या प्रमाणात घरकुलांचे वितरण होणार आहे. राज्य सरकारकडून प्रत्येक घरकुलासाठी अतिरिक्त ५० हजार रुपयांची मदत दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

# लग्नाहून परतणाऱ्या कुटुंबावर काळाची झडप, अकोल्यात रस्त्याच्या कडेला उभ्या असेलला कंटेनरला कार येऊन धडकली : दोघांचा दुर्दैवी मृत्यू, ६ गंभीर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**अकोला** - अकोला जिल्ह्यात गुरुवार मध्यरात्रीच्या सुमारास भीषण अपघात झालाय. या भीषण अपघातात दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर इतर ६ जण गंभीर जखमी झाले आहेत. अकोल्यातील राष्ट्रीय महामार्गावरील बोरगाव मंजू जवळ रात्री उशिरा हा अपघात झालाय. महामार्गावरील बोरगाव मंजू जवळ डिझेल संपल्यामुळे रस्त्यालगत उभ्या असलेल्या कंटेनरला 'ईको' गाडी येऊन धडकली. हि धडक इतकी जोरदार होती कि या अपघातात माना येथील एका लग्नाहून परतणाऱ्या कुरेशी कुटुंबातील दोन सदस्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर अन्य सहा जण जखमी झाले आहेत. ज्यांपैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. दरम्यान, मृतांमध्ये शेख अर्शियान शेख इरशाद नावाच्या ७ वर्षीय बालकाचा आणि अब्दुल कारूस शेख बिरम नावाच्या ६५ वर्षीय वृद्धाचा समावेश आहे. जखमींमध्ये चार महिला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे. भरधाव कारची उभ्या पीकअप गाडीला धडक, कारमधील ८ जण गंभीर दुसरीकडे, पुण्याच्या मुळशी तालुक्यातील पौडजवळ मध्यरात्री भरधाव कारची उभ्या पीकअप गाडीला धडक बसून भीषण अपघात झाल्याची घटना घडलीय. या अपघातात कारमधील ८ जण गंभीर जखमी असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु असल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रात्री उशिरा पुणे-कोलाड महामार्गावर ही घटना घडली आहे.

# सार्वजनिक आरोग्य समिती अध्यक्ष ॲक्शन मोडवर

## महापालिका प्रमुख रुग्णालयांमधील सुविधांचा घेतला आढावा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालयांमधील विविध सुविधांबाबत महापालिका आरोग्य समिती अध्यक्ष हरिष भांदीर्गे यांनी आढावा घेतला. विनाखर्च चांगल्या सुविधा सामान्य नागरिकांपर्यंत कशा पोहोचवता येईल या उद्देशाने सर्वसामान्य नागरिकांना सुलभ व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्याचे निर्देश देत यासाठी प्रयत्न रुग्णालयात प्रयत्न करावेत आणि यासाठी प्रत्येक अधिष्ठाता आणि अधिक्षकांनी विशेष लक्ष द्यावे अशाप्रकारच्या सूचनाही भांदिर्गे यांनी केल्या. मुंबई महानगरपालिकेचे आरोग्य समितीचे अध्यक्ष हरिष भांदिर्गे जी यांनी बोलावलेल्या या बैठकीमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाचे उपायुक्त शरद उघडे जी, नायर रुग्णालय दंत महाविद्यालय अधिष्ठाता डॉ.माला दीक्षित सेठ गोर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय व राजे एडवर्ड स्मारक रुग्णालय (के.ई.एम.) अधिष्ठाता डॉ.हरिष पाठक जी, बा. य. ल. नायर धर्मार्थ रुग्णालय आणि टोप-ीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय अधिष्ठाता आणि संचालक, वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालये डॉ.शैलेश मोहिते जी, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालय व डॉ.रु.न.कूपर रुग्णालय अधिष्ठाता डॉ.(श्रीमती) छाया शिंदे जी, लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय अधिष्ठाता डॉ.प्रमोद इंगळे जीही उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांशी चर्चेनंतरच परांजपे यांचा शिवसेनेत प्रवेश : उदय सामंत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - माजी खासदार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते आनंद परांजपे यांचा शिवसेनेतील पक्ष प्रवेश हा राष्ट्रवादी काँग्रेस नेतृत्वाशी चर्चा केल्यानंतर झाला आहे, असा दावा शिवसेना नेते व मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी केला. परांजपे यांच्या पक्ष प्रवेशानंतर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वाद निर्माण करणाऱ्या बातम्या निराधार असल्याचे मंत्री सामंत यांनी सांगितले. बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. मंत्री उदय सामंत म्हणाले की, महायुतीत मित्र पक्षांनी युती धर्माचे पालन करावे, असे सामंजस्याने ठरले आहे. मात्र एखादा पदाधिकारी स्वत:हून पक्ष सोडणार असेल तर त्याने महायुतीतच राहावे ही आमची जबाबदारी आहे. परांजपे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर शिवसेना संसदीय पक्षाचे नेते खासदार श्रीकांत शिंदे यांनी त्यांना स्वगृही परतण्याचे आवाहन केले होते.



# विद्यार्थ्यांना नीट परीक्षा शुल्क परत दिले जाणार, पुर्नपरीक्षेचं शुल्क नाही, शहर निवडण्याचा पर्याय दिला जाणार : धर्मेंद्र प्रधान

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राष्ट्रीय चाचणी संस्थेने नीट–युजी परीक्षेची नवीन तारीख जाहीर केली. ही परीक्षा आता रविवार, २१ जून रोजी होणार आहे. पेपरफुटीच्या शक्यतेमुळे एनटीएने १२ मे रोजी ही परीक्षा रद्द केली होती. यापूर्वी ही परीक्षा ३ मे रोजी भारतातील ५५१ आणि परदेशातील १४ शहरांमध्ये घेण्यात आली होती. या परीक्षेसाठी ५,४०० हून अधिक परीक्षा केंद्रे उभारण्यात आली होती. २२.७९ लाख विद्यार्थी परीक्षेला बसले होते. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी कबूल करत सांगितले की, '१२ तारखेला जेव्हा आम्हाला पेपरफुटीबद्दल समजले, तेव्हा कोणत्याही चुकीच्या उमेदवाराची निवड होऊ नये असे आम्हाला वाटत होते. त्यामुळे, आम्ही जबाबदारीने सांगितले की आमची शून्य सहनशीलता आहे. असे असूनही, ही घटना घडली. त्यामुळे, आम्ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला.'




परीक्षेच्या वेळेत १५ मिनिटांची वाढ शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान म्हणाले, 'आम्ही परीक्षेत काही सुधारणा केल्या आहेत. लवकरच होणाऱ्या पुढील परीक्षेचे शुल्क आम्ही परत करणार आहोत. पुढील परीक्षेचे शुल्क शून्य असेल.' जेणेकरून विद्यार्थ्यांवर भार पडणार नाही. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीचे शहर निवडण्याचा पर्याय असेल. परीक्षेची वेळ १५ मिनिटांनी वाढवण्यात आली आहे. परीक्षा दुपारी २ वाजता सुरू होईल आणि सायंकाळी ५:१५ पर्यंत चालेल. प्रवेशपत्रे १४ जूनपर्यंत उपलब्ध होतील.

नीट पेपर लीक प्रकरणात आतापर्यंत ७ जणांना अटक सीबीआयने या प्रकरणात आतापर्यंत सात जणांना अटक केली आहे. त्यापैकी पाच जणांना, राजस्थानचा मंगीलाल बिनवाल, जामवारामगडचा त्याचा भाऊ दिनेश बिनवाल, मुलगा विकास बिनवाल, हरियाणाच्या गुरुग्रामचा यश यादव आणि नाशिकचा शुभम खैरनार यांना दिल्लीच्या राऊस ॲव्हेन्यू न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सर्व पाच आरोपींना सात दिवसांची कोठडी सुनावली आहे.

# येत्या ४ ते ६ महिन्यांत पालखी मार्ग पूर्ण होणार

## पालखी महामार्गाचे ८० टक्क्यांहून अधिक काम पूर्ण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाचे काम ८० टक्क्यांहून अधिक पूर्ण झाले असून, येत्या ४ ते ६ महिन्यांत हे दोन्ही आधुनिक मार्ग पूर्णपणे वारकऱ्यांच्या सेवेत दाखल होतील, अशी महत्त्वपूर्ण घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली. फलटण येथे पालखी मार्गाची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.




या महामार्गांच्या सद्यस्थितीबद्दल माहिती देताना गडकरी म्हणाले की, २३४ किलोमीटर लांबीचा संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग ७,६२५ कोटी रुपये खर्चून उभारला जात आहे. मोहळ ते हडपसर या टप्प्यांमध्ये विभागलेल्या या कामापैकी दिवे घाट ते हडपसर या भागात ६५ टक्के, तर धरमपुरी ते लोणंद या भागात ९८ टक्के काम पूर्ण झाले आहे. विशेषतः दिवे घाटातील १७ हेक्टर वनविभागाच्या जागेचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लावून तेथे डोंगराचे उत्खनन करून चार पदरी रस्ता तयार करण्यात आला आहे. १३० किलोमीटर लांबीचा संत तुकाराम महाराज पालखी मार्ग ४,४१६ कोटी रुपये खर्चाचा असून, त्यातील पाटस ते बारामती हा टप्पा पूर्ण झाला आहे, तर इंदापूर ते तोंडले आणि बारामती ते इंदापूर या टप्प्यांचे काम ९० टक्क्यांहून अधिक पूर्ण झाले आहे.

जेजुरी येथील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी २५० कोटी रुपयांचा २ किलोमीटर लांबीचा उड्डाणपूल उभारण्यात येणार असून, फलटण शहरातील अंतर्गत रस्ते विकासासाठी ९७ कोटी रुपयांचा निधी जाहीर करण्यात आला आहे. तोंडले येथे दोन्ही पालखी मार्ग एकत्र येतात, त्या ठिकाणी १०० कोटी रुपयांचा भव्य उड्डाणपूल उभारला जाणार आहे.

# कांद्याला २ हजार प्रतिक्विंटल हमीभाव आणि नुकसानीची भरपाई प्रति क्विंटल १५०० रुपये अनुदान द्या : जयंत पाटलांची सरकारकडे मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – कांद्याला किमान २००० रुपये प्रतिक्विंटल हमीभाव जाहीर करावा आणि सध्याच्या नुकसानीची भरपाई म्हणून प्रति क्विंटल १५०० रुपये अनुदान देण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून केली आहे.



शेतकरी आज अत्यंत गंभीर संकटात पाटील म्हणाले की, महाराष्ट्र हे देशातील अग्रगण्य कांदा उत्पादक राज्य असून नाशिक, पुणे, सोलापूर आणि छत्रपती संभाजीनगर यांसारख्या जिल्ह्यांतील लाखो शेतकऱ्यांचे जीवन पूर्णपणे या पिकावर अवलंबून आहे. मात्र, गेल्या काही काळापासून कांद्याच्या दरात झालेली मोठी घसरण आणि बाजारपेठेतील अनिश्चिततेमुळे हा शेतकरी आज अत्यंत गंभीर संकटात सापडला आहे.

बियाणे, खते, औषधे आणि मजुरीच्या खर्चात झालेली मोठी वाढ पाहता, सध्या बाजारपेठेत मिळणारा भाव उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान होत आहे.

राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना या आर्थिक विवंचनेतून बाहेर काढण्यासाठी शासनाने तातडीने काही ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. बाजार समित्यांमध्ये दर कोसळल्याने नाफेड आणि इतर संस्थांमार्फत मोठ्या प्रमाणावर कांदा खरेदी सुरू करून शेतकऱ्यांना आधार मिळणे आवश्यक आहे असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

'कांदा चाळ' उभारणीसाठी भरघोस अनुदान देण्यात यावे कांदा निर्यातीबाबतच्या अस्थिर धोरणामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय कांद्याची पत कमी होत आहे, तरी केंद्र सरकारशी समन्वय साधून एक दीर्घकालीन आणि स्थिर निर्यात धोरण राबवण्यात यावे.

## पंजाबराव लोखंडे यांचे निधन



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – करजगाव (गांधी घर) येथील प्रतिष्ठित नागरिक पंजाबराव अजाबराव लोखंडे यांचे नुकतेच वयाच्या ७४ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांचेवर करंजगाव (गांधीघर) येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा लहान मुलगा आकाश हा हिवरखेड येथील बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये कर्मचारी आहे. त्यांचे मागे पत्नी, २ मुले, २ मुली, जावई, नातवंडे असा असा बराच मोठा आप्त परिवार आहे

# मोर्शी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार यांची जिल्हा शल्य चिकित्सक संवर्ग संघटनेच्या अध्यक्षपदी निवड

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – येथील उपजिल्हा रुग्णालयाचे कर्तव्यदक्ष वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रमोद पोतदार यांची 'जिल्हा शल्य चिकित्सक संवर्ग, अकोला मंडळ विभाग' संघटनेच्या अध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे मोर्शी आणि वरूड परिसरातील आरोग्य क्षेत्रात आनंदाचे वातावरण असून, सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



डॉ.प्रमोद पोतदार यांनी मोर्शी आणि वरूड शहरात रक्तदान चळवळ प्रभावीपणे राबवून हजारो रक्ताच्या बाटल्या संकलित करण्याचा विक्रम प्रस्थापित केला आहे. केवळ प्रशासकीय कामातच नव्हे, तर रुग्णसेवेतही त्यांचा मोठा वाटा आहे. महिलांच्या गर्भपिशवीच्या शस्त्रक्रिया, हर्निया आणि हायड्रोसील सारख्या सामान्य शस्त्रक्रिया अत्यंत यशस्वीपणे पार पाडून त्यांनी सामान्य नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन ही मोठी जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

या निवडीबद्दल डॉ.सचिन कोरडे, डॉ.पंकज मुळे, डॉ.विवेक साबळे, डॉ.संभावित, डॉ.अंकुश झोडे, डॉ.मानकर, डॉ.ऋतुजा श्रीराव, डॉ.मेघा झामडे, डॉ.संगीता जैन, डॉ.गिरीश धोटे, डॉ.दिलीप टिंगणे यांनी आनंद व्यक्त केला आहे. तसेच उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचारी मनीष अग्रवाल, सुजित वानखडे, रितेश कुकडे, विनय शेलुरे, प्रकाश मंगळे, प्रशांत बेहरे, आशिष पाटील, प्रदीप पावडे, अमोल झाडे, चेतन देशमुख, नंदू थोरात, रूत लोखंडे, वर्षा दारोकर, विद्या पाटील, जयश्री मोरे, स्वाती बुरंगे, वृषाली भगत, सुजाता पांडे, रेशमा बहुरूपी, प्रवीण कापडे, वसीम शेख व इतर सर्व कर्मचाऱ्यांनी डॉ.पोतदार यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# हडपसर बॉम्ब प्रकरणाचा मास्टरमाईंड कोण?

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**हडपसर** – पुण्यातील हडपसर परिसरातील कामधेनू इस्टेट येथे असलेल्या उषाकिरण रुग्णालयाच्या प्रवेशद्वारासमोर बॉम्बसदृश वस्तू आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.




घटनेची माहिती मिळताच पोलिस, बॉम्बशोधक व नाशक पथक (बीडीडीएस), अग्निशमन दल आणि इतर सुरक्षा यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. या घटनेमुळे काही काळ परिसरात भीती आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराजवळ संशयास्पद वस्तू दिसून आल्याने नागरिकांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली.

त्यानंतर पोलिसांनी परिसर तातडीने सील करत नागरिकांना सुरक्षित अंतरावर हलवले. रुग्णालय परिसरातील वाहतूकही काही काळासाठी वळवण्यात आली होती. बॉम्बशोधक व नाशक पथकाने अत्यंत सावधगिरीने संशयित वस्तू ताब्यात घेतली. ही वस्तू पुढील तपासणीसाठी ग्लायडिंग सेंटरच्या मोकळ्या जागेत नेण्यात आली. तेथे विशेष पद्धतीने तिची तपासणी करून निष्क्रिय करण्यात आले.

सुरक्षा यंत्रणांनी संपूर्ण कारवाई नियंत्रित आणि सुरक्षित पद्धतीने पार पाडल्याने जीवितहानी अथवा मालमत्तेचे नुकसान झाले नाही.

## गव्हाणकुंडच्या सौर ऊर्जा प्रकल्पाला

# जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांची भेट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – श्री क्षेत्र गव्हाणकुंड येथे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी नुकतीच भेट दिली.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेतंर्गत कार्यान्वित कारण्यात आलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पाची खडा न खडा माहिती जिल्हाधिकारी यांना महाजेनकोचे अधिकारी विरेंद्र निमजे यांनी दिली. प्रकल्पामधुन किती युनिट तयार होते? हा प्रकल्प कोणाला हॅंडवॉर करण्यात आला? संपुर्ण प्रकारची माहिती देण्यात आली. यावेळी विरेंद्र निमजे, गजानन सोळंकी, सौर ऊर्जा प्रकल्प व्यवस्थापक संजय पवार, किशोर राऊत, चेतन पडोळे, लक्षित ठेंगेवर, राहुल नागपुरे, दीपक पडोळे, रवी कोहरे, संदीप गाडबैल, रोशन कोहळे, नितेश कवडे, सचिन युवनाते, निलेश ठेंगेवार आदी कर्मचारी उपस्थित होते.



## अरविंद सहकारी बँकेत

# स्व.अरविंदबाबु देशमुख यांची जयंती उत्साहात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – शहरातील सहकार क्षेत्रात अग्रणी असलेल्या अरविंद सहकारी बँकेचे संस्थापक आणि विधायक कार्याचे जनक स्व.अरविंदबाबु देशमुख यांची जयंती साजरी करण्यात आली. बँकेच्या मुख्य कार्यालयात हा जयंती सोहळा उत्साहात पार पडला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बँकेचे पालक संचालक अशोक देवते होते. त्यांनी स्व.अरविंदबाबु देशमुख यांच्या जीवनकार्य आणि विचारांवर प्रकाश टाकला. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समिती माजी संचालक सुभाषराव शेळके, प्रमोद कोहळे, मुख्य कार्यकारी अधिकारी राजाराव, नंदकिशोर घोरमाडे, सुकांत यावले, विनय चौधरी आणि अंजली ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे संचालन व प्रास्तविक बँकेचे व्यवस्थापक छत्रपती शेळके तर उपस्थितांचे आभार बँकेचे अधिकारी योगेश राऊत यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निलेश बनसोड, मनीष शेळके, अंकित चोरे, विजय वाघाडे, अमीन रेवतकर, पल्लवी चौधरी, पुजा उमाळे, मोरेश्वर बोडखे, अक्षय घोरमाडे, पवन पारडशिंगे आणि सागर साबळे यांनी परिश्रम घेतले.

# संपादकीय

**आपल्या मनाचे शिल्पकार बना : स्वप्नांना आकार देण्याचे काम करा**

## लोकशाहीपुढील गंभीर आव्हान: 'बंगाल पॅटर्न' आणि अराजकतेची चाहूल

भारतासारख्या विशाल लोकशाही देशात निवडणुका हा केवळ सत्तेचा सोपान नसून तो एक राष्ट्रीय उत्सव मानला जातो. मात्र, गेल्या काही वर्षांत या उत्सवाला हिंसेचे आणि दहशतीचे गालबोट लागताना दिसत आहे. विशेषतः 'बंगाल पॅटर्न' म्हणून ओळखली जाणारी जी कार्यपद्धती राजकारणात मूळ धरू लागली आहे, ती केवळ एका राज्यापुरती मर्यादित राहिलेली नाही. जर हीच कार्यपद्धती भविष्यातील निवडणुकांचे मानक बनली, तर भारतीय लोकशाहीला अराजकतेच्या खाईत लोटण्यापासून कोणीही वाचवू शकणार नाही. लोकशाहीला आतून पोखरणाऱ्या या घटकांचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आता आली आहे. 'बंगाल पॅटर्न' म्हणजे नक्की काय? 'बंगाल पॅटर्न' या शब्दाचा अर्थ केवळ पश्चिम बंगालमधील राजकारण असा नाही, तर तो एका विशिष्ट राजकीय संस्कृतीचा द्योतक बनला आहे. यात प्रामुख्याने खालील गोष्टींचा समावेश होतो: निवडणूकपूर्व आणि निवडणुकोत्तर हिंसा: निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यापासून ते निकाल लागेपर्यंत आणि निकालानंतरही विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांवर होणारे हल्ले, त्यांची घरे जाळणे आणि दहशतीचे वातावरण निर्माण करणे. प्रशासनाचे राजकीयकरण: पोलीस आणि स्थानिक प्रशासन हे निष्पक्ष काम करण्याऐवजी सत्ताधारी पक्षाचे 'कार्यकर्ते' म्हणून काम करू लागतात. मतदारांचे भयभीत होणे: भीतीपोटी मतदारांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचू न देणे किंवा विशिष्ट उमेदवारालाच मतदान करण्यास भाग पाडणे. विरोधी पक्षाचे अस्तित्व नाकारणे: 'ज्याला राजकारण करायचे असेल त्याने सत्ताधारी पक्षात यावे, अन्यथा परिणामांना सामोरे जावे,' अशी टोकाची भूमिका घेणे. ही कार्यपद्धती लोकशाहीच्या 'सर्वसमावेशकता' आणि 'मतमतांतरे' या मूलभूत तत्त्वांना थेट हरताळ फासणारी आहे. लोकशाहीला लागलेली वाळवी लोकशाही ही केवळ मतांच्या आकड्यांवर चालत नाही, तर ती नैतिकता, सहिष्णुता आणि कायद्याचे राज्य यावर आधारलेली असते. जेव्हा हिंसा हा राजकारणाचा मुख्य भाग बनतो, तेव्हा लोकशाहीचे रूपांतर 'भीतीशाही'त होते. 'बंगाल पॅटर्न' जर देशाच्या इतर भागात पसरला, तर त्याचे परिणाम भयावह असतील: संघटनात्मक स्वातंत्र्याचा संकोच: जेव्हा कार्यकर्त्यांना जीव जाण्याची भीती वाटते, तेव्हा लोक राजकीय प्रक्रियेतून बाहेर पडू लागतात. यामुळे निरोगी स्पर्धा संपते आणि एकाधिकारशाहीचा उदय होतो. संस्थात्मक ऱ्हास: निवडणूक आयोग, पोलीस आणि न्यायालय यांसारख्या संस्थांवरील लोकांचा विश्वास उडू लागतो. जेव्हा न्याय मागण्यासाठी गेलेल्या पीडिताला पुन्हा हिंसेचा सामना करावा लागतो, तेव्हा अराजकता जन्माला येते. विकासाला खिळ: ज्या राज्यात सातत्याने राजकीय अस्थिरता आणि हिंसा असते, तिथे गुंतवणूक येत नाही. तरुण पिढी रोजगारासाठी बाहेर पडते आणि राज्य वैचारिक व आर्थिकदृष्ट्या मागे पडते.

# भग्न दगडांपासून अखंड श्रद्धेपर्यंत : सोमनाथची गाथा

**ब्रिजेश सिंह, प्रधान सचिव तथा महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लवकरच, १३ नोव्हेंबर १९४७ रोजी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री आणि उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल सोमनाथ येथे गेले. समुद्रकिनारी उभे राहून त्यांनी मंदिराच्या भग्नावशेषांकडे गंभीर नजरेने पाहिले आणि एक प्रतिज्ञा केली सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाची. तो क्षण म्हणजे भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाचा पहिला मोठा जागर; आपल्या सभ्यतेच्या स्वाभिमानाच्या सार्वजनिक पुनर्प्राप्तीचा क्षण होता.

आणि आता, ११ मे रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सोमनाथ अमृत महोत्सवात उपस्थित राहून मंदिराच्या पुनर्स्थापित तेजात सहभाग घेतला, तेव्हा तीच प्रतिज्ञा पुन्हा नव्याने प्रज्वलित झाल्यासारखी वाटते. विशेष महापूजा, कुंभाभिषेक, ध्वजारोहण आणि लाखो भाविकांची उपस्थिती हे सर्व मिळून भग्नावस्थेतून पुनर्निर्माणाकडे आणि पुनरुत्थानाकडे झालेल्या अखंड प्रवासाची घोषणा करतात. सरदार पटेलांच्या दूरदृष्टीपासून आजच्या आत्मविश्वास पूर्ण भारतापर्यंतचा हा अखंड सांस्कृतिक प्रवाह आहे. ही परंपरा, कालातीत आणि प्रेरणादायी, प्रत्येक पिढीला आपल्या वारशाचे जतन करण्याचे, ऐक्याचे रक्षण करण्याचे आणि भारताच्या सनातन आत्म्यावर दृढ श्रद्धा ठेवत समृद्ध, सुसंवादी आणि अखंड भविष्याकडे वाटचाल करण्याचे आवाहन करते.

अमेरिकन लेखक मार्क ट्वेन यांनी एकदा म्हटले होते की वाराणसी इतिहास, परंपरा आणि आख्यायिकांपेक्षाही प्राचीन आहे. पण कदाचित त्यांनी प्रभास पाटण आणि सोमनाथ पाहिले नसावे. भागवत पुराणानुसार, चंद्राला त्याचे सासरे दक्ष यांनी शाप दिला होता. त्या शापातून मुक्त होण्यासाठी चंद्राने याच स्थळी भगवान शिवाची आराधना केली आणि म्हणूनच 'सोमनाथ-चंद्राचा अधिपती' हे नाव उदयास आले.

मंदिर उभे राहण्याच्या खूप आधीपासून प्रभास पाटण हे मानवी वस्तीचे केंद्र होते. इ.स.पू. ३००० पासून येथे शेती आणि पशुपालन करणारी पूर्व-हडप्पा संस्कृती अस्तित्वात होती. सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासानंतरही येथे जीवन टिकून राहिले. येथे सापडलेली रेड पॉलिश्ड वेअर मातीची भांडी आणि प्रारंभीच्या लिपींचे पुरावे याची साक्ष देतात. इसवी सनाच्या प्रारंभीच्या शतकांत हे एक साधे पण महत्वाचे नगर होते. समुद्रकिनाऱ्यालगत ७ ते १० मीटर खोलीवर सापडलेले दगडी नांगर प्राचीन सागरी व्यापाराचे साक्षीदार आहेत. हा किनारा केवळ निसर्गरम्य नव्हता, तर व्यापाराचे प्रवेशद्वार होता. येथे वस्ती आणि पवित्रता एकत्र वाढत गेली. प्राचीन ग्रंथांमध्ये प्रभास क्षेत्राला तीर्थ म्हणून संबोधले आहे. महाभारतामध्ये भगवान कृष्णाच्या देहत्यागाचे स्थळ म्हणून प्रभासाचा उल्लेख आहे. दगडांनी अमरत्वाची भाषा शिकण्यापूर्वीच हा किनारा सांसारिक आणि आध्यात्मिक जगामधील एक पवित्र संगम होता. त्याची प्रारंभीची रूपे साधीह्लाकूड आणि गवताचीह्लअसली, तरी ती मानवी मनाच्या दैवी शोधाची खूण होती. इ.स. ६४९ च्या सुमारास वल्लभीच्या मैत्रक राजवटीत पहिले ऐतिहासिकदृष्ट्या प्रमाणित मंदिर उभे राहिले. पुढे ९व्या-१०व्या शतकात चालुक्य/सोलंकी काळात सोमनाथ हे काशी आणि उज्जैनच्या बरोबरीचे प्रमुख तीर्थस्थान बनले. पुरातत्त्ववेत्ता बी. के. थापर यांना १९५०-५१ मधील उत्खननात असलेले गर्भगृह, अंतराळ आणि सभामंडप यांचा समावेश असलेली भव्य रचना. पूर्वाभिमुख त्रि-अंग संधार प्रासादाचे अवशेष सापडले. लक्षुलीश मूर्तीच्या अवशेषांनी त्याची शैव परंपरा सिद्ध केली. विद्वान मंदिराच्या नेमक्या कालखंडावर मतभेद करतात, परंतु एक गोष्ट निर्विवाद आहे सोमनाथ त्या काळात अत्यंत वैभवशाली झाले होते आणि लवकरच त्याची कठोर परीक्षा होणार होती.



ही परीक्षा अनेक लाटांमध्ये आली. इ.स.७२५ मध्ये उमय्यद सेनापती जुनैद इब्न अब्द अल-रहमान अल-मुरीने हल्ला केला, जो पहिला इस्लामी आक्रमण मानला जातो. परंतु सर्वात मोठा आघात ८ जानेवारी १०२६ रोजी झाला, जेव्हा गझनीचा महमूद आपल्या पंधराव्या मोहिमेत सोमनाथावर चालून आला. शिवलिंग फोडण्यात आले, खजिना लुटण्यात आला. अल बिरुनी यांनी मंदिरातील संपत्तीचे वर्णन केले आहे. सोने, चांदी, मोती, रत्ने आणि गावांच्या महसुलातून जमा झालेली संपदा. तथापि, पुरातत्त्वीय पुरावे दर्शवतात की मंदिराचे भग्नावशेष त्वरित एकत्र करून सुरक्षितपणे पुरले गेले. म्हणजेच, श्रद्धा उद्ध्वस्त झाली नव्हती. इ.स. १०३८ मध्ये गोव्याच्या कदंब राजाने सोमनाथाला भेट दिली, यावरून पूजा-अर्चा किंवा पुनरुज्जीवनाची भावना त्वरित पुन्हा उभी राहिल्याचे दिसते. मंदिराचे रूप तुटले, पण संस्कृतीचे चेतन कायम राहिले. पुढील काळातही विध्वंस आणि पुनर्निर्माण यांचे चक्र सुरूच राहिले. इ.स. ११६९ मध्ये सोलंकी राजा कुमारपालाने पाचवे भव्य दगडी मंदिर उभारले. प्रभास पाटण येथील भद्रकाली मंदिरातील शिलालेखात त्याचा उल्लेख आहे. त्यानंतर १२९९ मध्ये अलाउद्दीन खिलजीचा सेनापती उलुघ खानने मंदिर उद्ध्वस्त केले. स्थानिक रक्षक वाजा मालसुत आणि पदमल यांनी मंदिररक्षण करताना प्राण दिले. पुढे चुडासमा राजा महिपाल देव यांनी १३०८ मध्ये मंदिराचे पुनर्निर्माण केले आणि त्यांचा पुत्र खेंगाराने शिवलिंगाची पुनःप्रतिष्ठा केली.

यानंतर झफर खानने १३९५ मध्ये मंदिर उद्ध्वस्त करून तेथे जामा मशिद आणि प्रशासकीय ठाणे उभारल्याचे उल्लेख आहेत. पुढे महमूद बेगडा, पोर्तुगीज आक्रमक, आणि नंतर औरंगजेब यांच्या आदेशाने १६६५ आणि १७०६ मध्ये पुन्हा विध्वंस घडवून आणण्यात आला. पुजाऱ्यांची हत्या, मंदिर परिसरातील अपवित्र कृत्ये आणि संपूर्ण रचना पाडण्याचे प्रयत्न झाले; परंतु तीर्थक्षेत्र टिकून राहिले. जरी मंदिर वारंवार उद्ध्वस्त झाले, तरी स्मृती कधीच नष्ट झाली नाही. इ.स. १७८२-८३ मध्ये पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या वैयक्तिक निधीतून सोमनाथाजवळ नवीन दगडी मंदिर उभारले. हे मंदिर १९व्या आणि २०व्या शतकात सोमनाथच्या श्रद्धेचे केंद्र राहिले. १८४२ मध्ये ब्रिटिश गव्हर्नर-जनरल लॉर्ड एलेनबरो यांनी अफगाणिस्तानातील महमूद गझनीच्या कबरीतून चंदनाचे दरवाजे आणले आणि ते सोमनाथचे मूळ दरवाजे असल्याचा खोटा दावा केला. हा ब्रिटिश सत्तेचा हिंदू समाजाचे समर्थन मिळवण्यासाठी आणि ब्रिटिश राजवटीला वैध ठरवण्यासाठी राजकीय प्रचार होता. हे दरवाजे नंतर आग्रा किल्ल्यात ठेवण्यात आले.

१९२२ मध्ये के.एम. मुन्शी यांनी सोमनाथचे भग्नावशेष पाहिले. त्यांनी त्या अनुभवाचे वर्णन भक्ती आणि लज्जा असे केले आणि याच अनुभवातून त्यांच्या मनात मंदिर पुनर्निर्माणाची आजीवन बांधिलकी निर्माण झाली. स्वातंत्र्यानंतर सोमनाथच्या इतिहासाचे अंतिम पर्व सुरू झाले. ऑक्टोबर १९४७ मध्ये जुनागढ भारतात विलीन झाले आणि हिंदूंना मंदिर दुरुस्तीवरील बंदी हटवण्यात आली. १२-१३ नोव्हेंबर १९४७ रोजी सरदार पटेल, एन. व्ही. गाडगीळ आणि जामसाहेब यांनी भग्नावशेषांना भेट दिली. तेव्हा पटेलांनी जाहीर केले: या शुभ नववर्षदिनी आम्ही सोमनाथ मंदिर पुनर्निर्माणाचा निर्णय घेतला आहे. जुनागढ प्रशासन आणि जामसाहेबांनी तत्काळ देणग्या दिल्या. सुमारे ५,००० एकर जमीन मंदिर, संस्कृत विद्यापीठ आणि सांस्कृतिक केंद्रासाठी राखीव ठेवण्यात आली.

यानंतर वाद निर्माण झाला. महात्मा गांधींच्या सल्ल्यानुसार सरकारने थेट निधी न देता लोकवर्गणीतून मंदिर उभारण्याचा निर्णय घेतला, जेणेकरून हे राज्यप्राय धार्मिक प्रकल्प न राहता लोकसहभागातून उभे राहिलेले सांस्कृतिक पुनरुत्थान ठरेल. दरम्यान, तत्कालीन प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरु यांनी या प्रकल्पाला 'हिंदू पुनरुत्थानवाद' म्हणून विरोध केला. परंतु सार्वजनिक देणग्यांमुळे प्रकल्प थांबवता आला नाही. १५ डिसेंबर १९५० रोजी सरदार पटेल यांचे निधन झाले, तरी काम सुरूच राहिले. अखेर ११ मे १९५१ रोजी राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. सोमपुरा शिल्पकारांनी बांधलेल्या मारू-गुर्जर शैलीतील मंदिरात नवीन ज्योतिर्लिंगाची स्थापना झाली. शतकानुशतके कुजबुजत राहिलेली प्रतिज्ञा अखेर दगडात साकार झाली. नेहरू या समारंभाला उपस्थित नव्हते.

आज सोमनाथ हे केवळ पर्यटनस्थळ किंवा धार्मिक प्रतीक नाही; ते दगड आणि गाळात लिहिलेले भारतीय संस्कृतीचा इतिहासग्रंथ आहे. त्याची खरी ओळख अखंड वैभवात नसून प्रत्येक विध्वंसानंतर पुन्हा उभे राहण्याच्या मानवी निर्णयात आहे. त्याच्या पायाभूत थरांमध्ये हडप्पाकालीन वसाहती, प्राचीन व्यापारी आणि शांतीच्या शोधात आलेले भक्त सामावलेले आहेत. प्रत्येक पुनर्निर्माण-मैत्रक राजे, सोलंकी सम्राट, मराठा राण्या किंवा नवस्वतंत्र भारत यांना ही समाप्ती नाही; आम्ही पुन्हा उभारू हा एक जाणीवपूर्वक केलेला उच्चार होता.

सोमनाथ आपल्याला शिकवते की लवचिकता म्हणजे कधीही न पडणे नव्हे, तर पडूनही कायमचे न राहणे पुन्हा पुन्हा उभे राहणे. समुद्रकिनारी उभे असलेले हे मंदिर केवळ भगवान शिवाचे स्मारक नाही; तर त्या अदम्य मानवी आत्म्याचे प्रतीक आहे, जो शतकानुशतके समुद्राच्या काठावर येऊन शांतपणे म्हणत राहतो

**आम्ही अजूनही येथे आहोत.**
**आम्ही स्मरण ठेवतो.**
**आम्ही पुन्हा उभारतो.**
**आम्ही टिकून राहतो.**

# टाळ-मृदंगाच्या नादातुन व्यसनमुक्तीचा संदेश

कीर्तन म्हणजे केवळ देवाचे गुणगान नाही तर समाजाला जागे करणारी रणभेरी आहे. हे वाक्य प्रत्यक्ष जगणारे नाव म्हणजे ह.भ.प.संतोष बाबाजी निंभाळकर, रा.हरताळा, ता.भातकुली, जि.अमरावती महाराज सांगतात की, मी जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शिकविले, मुलं घडविली परंतु नंतर आमच्या गावातील शाळाचं बंद झाली आता शिक्षण घेण्याकरीता विद्यार्थी भातकुली किंवा खोलापूर येथे शिक्षण घेण्यासाठी जातात. वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी हातात चिपळ्या आणि मुखी हरीनाम घेऊन सुरु झालेला त्यांचा प्रवास आज ५२ व्या वर्षी हजारो संसार उभे करणारा 'प्रबोधनाचा महामेरु' बनला आहे.



**वारकरी परंपरेचा वारसा घरातच कीर्तनाची शाळा** – संतोष महाराजांचे घर म्हणजे 'कीर्तनाची विद्यापीठ'. त्यांचे पणजोबा व आजोबा हे अमरनेरकर परंपरेतील प्रसिद्ध कीर्तनकार. घरात सकाळ-संध्याकाळ टाळ-मृदंगाचा नाद. वडिलांच्या खांद्यावर बसून कीर्तन ऐकत संतोष बाबा मोठे झाले. आमच्या घरात अखंड हरिनामाची परंपरा आहे. वडिलांनी शिकवले – पोटापुरते कीर्तन करु नको, समाजासाठी कर, अशी आठवण महाराज सांगतात.

**१६ व्या वर्षी पहिले कीर्तन :** शाळेतुन थेट नारदाच्या भूमिकेत – गावातील जिल्हा परिषद शाळेत शिकत असतानाच १६ व्या वर्षी त्यांनी पहिले कीर्तन केले. आवाजात गोडवा, निरुपणात स्पष्टता. गावकऱ्यांनी डोक्यावर घेतले. पुढे ९ वी व १० वी शिकत असतानाच त्यांनी लहान मुलांना कीर्तन, भजन, श्लोक शिकवायला सुरुवात केली. शाळेचा दप्तर एका हातात आणि चिपळ्या दुसऱ्या हातात. शाळा सुटली की थेट मंदिरात, असे त्यांचे बालपण.

**आता शाळा सुटली, पण वर्ग सुरूच :** भातकुली-खोलापूरची वारी – शालेय शिक्षण पुर्ण झाले पण समाज-शिक्षणाची शाळा कधी बंद झाली नाही. आजही महाराज भातकुली, खोलापूर, हरताळा पंचक्रोशीत दर आठवड्याला कीर्तन, कथा, प्रबोधनासाठी जातात. शेतकरी, मजूर, युवक, महिला-सर्व त्यांचे 'विद्यार्थी'. माझी शाळा आता मंदिराचा सभामंडप आहे. इथे मार्क नाही पडत, संस्कार पडतात, असे ते हसत म्हणतात.

**कथावाचन : रामायण, भागवत, शिवपुराणातून जीवनाचे सार –** संतोष महाराज हे केवळ कीर्तनकार नाहीत तर अभ्यासु कथावाचक आहेत. रामायण सांगताना 'पितृभक्ती' शिकवतात, श्रीमदब भागवत मधून 'कृष्णनीती' उलगडतात, तर शिवपुराण मधुन 'सांसारिक जबाबदारी' पटवुन देतात. त्यांच्या कथेला गर्दी होते ती चमत्कार ऐकायला नाही तर संसाराचे उत्तर शोधायला. माझ्या कथेतुन कुणाला व्यसन सुटले, कुणाचा संसार जुळला, यातच माझे समाधान, अशी त्यांची भावना.



**वार्तापत्र शेषराव कडु**
वरुड, जि.अमरावती
मो.९९२३९८८७३४

**प्रबोधनाचा मुख्य मंत्र : व्यसनमुक्ती आणि हिंदु धर्मजागृती** – महाराजांचे कीर्तन म्हणजे टाळ-मृदंगासह सामाजिक क्रांती. गेल्या ३५ वर्षांत त्यांनी हजारो युवकांना दारु, गुटखा, तंबाखूपासून परावृत्त केले. व्यसनामुळे घर उध्वस्त होते. कीर्तनातुन मी दाखवुन देतो-रामाने राज्य सोडले पण व्यसन केले नाही. मग आपण का करावे? असा थेट सवाल ते तरुणांना विचारतात. हिंदु धर्माचा प्रसार हे त्यांचे जीवितकार्य. धर्म म्हणजे द्वेष नाही, धर्म म्हणजे कर्तव्य. आई-वडिलांची सेवा, गाईची सेवा, गोरगरीबाला मदत-हाच खरा हिंदु धर्म, असे ते सोप्या भाषेत समजावतात. गावोगावी हनुमान चालीसा पठण, सामुहिक नामस्मरण, भागवत सप्ताह यांचे आयोजन करुन ते धर्मजागृती करतात.

**वडिलांपासून आजपर्यंत : जनसेवेचा अखंड यज्ञ** – संतोष महाराज सांगतात, वडिलांनी शिकवले-कीर्तनकाराने फक्त दक्षिणा घेऊ नये, समाजाचे दुःख घ्यावे. त्याच व्रताने मी चालतो. गावात कुणाचे लग्न जमेना, कुणाच्या घरात भांडण, कुणाला आजार-महाराज धावुन जातात. कीर्तनातुन जमा झालेली वर्गणी ते गरीब मुलींच्या लग्नाला, रुग्णसेवेला देतात. कोविड काळात त्यांनी गावात अन्नछत्र, औषध वाटप केले.

हरि सेवा फाऊंडेशनच्या बाल सुसंस्कार शिबिरात ते सध्या मुख्य प्रशिक्षक म्हणुन सेवा देत आहेत. वरुडच्या जागृत स्कूलमध्ये ते लहान मुलांना टाळ-मृदंग, श्लोक, रामरक्षा शिकवतात. हीच मुले उद्याचा भारत घडवतील. त्यांना आजच संस्कार दिले पाहिजे, अशी त्यांची तळमळ.

**संपर्क व सहकार्य** – वयाची ५२ वर्षे पुर्ण पण उत्साह १६ वर्षांच्या तरुणाइतका. कीर्तन-प्रबोधनासाठी कोणत्याही गावी, कोणत्याही वेळी उपलब्ध असतात. मानधन ठरवत नाही, यजमान देईल ते आनंदाने स्विकारतो. कारण ही सेवा आहे, धंदा नाही, असे ते ठामपणे सांगतात. आजच्या काळात कीर्तन म्हणजे 'करमणुक' झाली आहे पण संतोष बाबाजी निंभाळकर यांच्यासारखे महाराज कीर्तनाला पुन्हा 'प्रबोधन' बनवत आहेत. त्यांच्या टाळाच्या प्रत्येक ठोक्यात व्यसनमुक्तीचा नाद आहे, मृदंगाच्या प्रत्येक बोलात हिंदु एकतेची हाक आहे.

अमरनेरकर परंपरेचा हा वारसा, हरताळ्याची ही शान, अमरावती जिल्ह्याचा हा अभिमान आहे. वडिलांकडुन मिळालेली 'जनसेवेची चिपळी' ते आजही अखंड वाजवत आहेत. पुढील वाटचालीस वरुडच्या जनतेकडून कडून खूप खूप शुभेच्छा..!

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# राज्यात उन्हामुळे काहिली! विदर्भातल्या अमरावती वर्धा अन अकोल्यात उष्णतेची लाट, तर नागपूरसह ५ जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा येलो अलर्ट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नागपूर** – राज्यातील बहुतांश जिल्ह्यांना तीव्र उन्हाचा फटका बसत असताना अवकाळी पावसाने एकच दाणादाण उडवली आहे.

या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला आहे. अशातच आता विदर्भाला हवामान विभागाने एक



महत्वपूर्ण अलर्ट जरी केला आहे. हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार, विदर्भातल्या अकोला, अमरावती आणि वर्धा या तीन जिल्ह्यासाठी नागपूर वेध शाळेने उष्णतेच्या लाटेचा येलो अलर्ट जाहीर केला आहे. या तीन जिल्ह्यातील नागरिकांनी दुपारच्या वेळेला घराबाहेर पडतांना काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. दुसरीकडे, या व्यतिरिक्त नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या पाच जिल्ह्यांना वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. त्यामुळे सध्या विदर्भातील नागरिकांना उष्णेतीची लाटेसह, अवकाळी पाऊस आणि उकाडा अशा दुहेरी त्रासाचा सामना करावा लागणार आहे.

**अमरावतीसह ग्रामीण भागाचा पाणीपुरवठा बंद**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील तब्बल १८.८१ कोटी रुपयांची प्रलंबित देयके न मिळाल्याने अमरावती जिल्हा जीवन प्राधिकरण कंत्राटदार असोसिएशनने देयकांच्या मागणीसाठी ६ मे पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अमरावती कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले आहे.

आठ दिवस उलटून अद्यापपर्यंत अधिकारी किंवा शासनाने आंदोलनाची कुठलीही दखल घेतलेली नाही. परिणामी कंत्राटदार असोसिएशनने आंदोलन तीव्र केले असून आजपासून पाणीपुरवठा देखभाल व दुरुस्तीची सर्व कामे बंद करण्याचा इशारा दिला होता. आता सगळे असोसिएशनचे कंत्राटदार आणि त्यांचे कर्मचारी आंदोलनस्थळी व्हॉल्व ऑपरेशन स्पॅणर घेऊन दाखल झाले आहे.

'आमचे १८ कोटी रुपयांचे देयके मिळत नाही तोपर्यंत आम्ही अमरावती शहरात पाणीपुरवठा सुरू करणार नाही,' असा इशारा सरकारला दिला आहे. या आंदोलनाचा अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागातील ३५४ गावातील आणि अमरावती शहरासह दर्यापूर, अंजनगाव सुर्जी आणि चिखलदरा शहराचा देखील पाणीपुरवठा आजपासून बंद करण्यात आला आहे. सरकारने तातडीने देयके देऊन तोडगा काढावा अशी मागणी होत आहे.

---

श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने

# भगवत व धनश्री उमक यांचा वाढदिवस

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – जरुड येथील श्री गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष व ग्रामगीता प्रचारक राजु उमक यांचे वडील भगवत उमक यांचा ८८ वा वाढदिवस व त्यांची पुतणी धनश्री उमक हिचा २० वा वाढदिवस श्री गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष व ग्रामगीता प्रचारक राजु उमक यांचे श्री गुरुदेव कृपा निवासस्थानी श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने वाढदिवस साजरा करण्यात आला.

आदर्श सक्रिय सेवक प्रचारक कार्यकर्ता मनोज माहुलकर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, शाल, सन्मानपत्र व ग्रामगीता देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन साजरा करण्यात



आला. यावेळी गुरुदेव सेवा मंडळाचे पदाधिकारी संजय पडोळे, संजय काळबेंडे, ह.भ.प.मीरा फुसे, ह.भ.प.अमोल गावंडे, ग्रामगीताचार्य श्री गुरुदेव सेवा युवा संघटनेचे ह.भ.प.राहुल बरडे, ह.भ.प.रजनी काळमेघ, महिला प्रमुख व प्रचारक ह.भ.प.विनोद बोंडे, ग्रामगीताचार्य प्रमिला कठाळे, पुष्पा नढे, कलावती उमक, राहुल नढे, साहेबराव, रविंद्र गजभीये, देवेंद्र धर्मे, मंदा पडोळे यांच्या उपस्थितीत वाढदिवस साजरा करुन पुढील आयुष्याकरीता शुभेच्छा देण्यात आल्या.

---

स्व.सं.सै.श्री.बळीरामजी फरकाडे उच्च माध्यमिक विद्यालयाचा

# इयत्ता १० व १२ वीचा उत्कृष्ट निकाल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्व.सं.सै.श्री. बळीरामजी फरकाडे उच्च माध्यमिक विद्यालय बेनोडा (श.) एच.एस.सी. बोर्ड कला शाखेचा निकाल ९६.११ टक्के तर इयत्ता १० वीचा निकाल ८८.७३ टक्के लागला आहे.

इयत्ता १२ कला शाखेतून निलम रमेशराव ढोमणे ही ७२.५० टक्के गुण घेवुन प्रथम, पुजा रमेशराव मरसकोल्हे ७१ टक्के घेवुन व्दितीय तर आरती नंदकिशोर सुरजूसे ही ७०.११ टक्के गुण घेवुन तृतीय येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे.

शहीद स्मृती विद्यालय बेनोडा (श.) चा





एस.एस.सी. बोर्ड निकाल ८८.७५ टक्के लागला असून पुनम शंकर गोहत्रे ८०.८० टक्के घेत प्रथम, मनस्वी मनोज सातपुते ७८.२० टक्के घेत व्दितीय तर रोशनी मोहन बर्मन हिने ७०.८० टक्के गुण मिळवित तृतीय क्रमांक प्राप्त केला.

शहीद स्मृती शिक्षण समिती गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेतर्फे अध्यक्ष प्रा.विनय फरकाडे, उपाध्यक्ष रमाकांत फरकाडे, उपाध्यक्ष श्रीधर सोलव, सचिव नारायन फरकाडे, सदस्य आनंद फरकाडे तसेच सर्व सदस्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचे कौतूक केले आहे.

---

# राणी बागेत लवकरच सिंहांची जोडी येणार : गुजरात सरकारची मंजुरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – चार ते पाच वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेर भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान वनस्पती व प्राणी संग्रहालयात आशियाई सिंहाची जोडी येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

याबाबत गुजरात सरकारने मंजुरी दिली आहे. सिंहांच्या जोडीच्या बदल्यात राणी बागेतील कुठले प्राणी-पक्षी द्यायचे हे लवकरच निश्चित होईल. राणी बागेत सिंहांची जोडी यावी यासाठी गुजरातच्या वनमंत्र्याना मार्च २०२६ मध्ये पत्र लिहिले होते.

आता गुजरात सरकारने मंजुरी दिल्याने लवकरच मुंबईकर पर्यटकांना गुजरातच्या सक्करबाग प्राणीसंग्रहालयातील सिंहाच्या जोडीची धमाल मस्ती अनुभवता येणार आहे, असा विश्वास महापौर रितू तावडे यांनी व्यक्त केला.

दक्षिण मुंबईतील भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणी संग्रहालय पर्यटकांचे आकर्षण.

---

# तैवान मुद्द्यावरून संघर्ष होईल : जिनपिंग यांचा ट्रम्प यांना इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***बीजिंग*** – चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात गुरुवारी इराण युद्ध, ऊर्जा सुरक्षा आणि व्यापार या विषयांवर व्यापक चर्चा झाली. तैवानचा मुद्दा योग्य पद्धतीने न हाताळल्यास दोन्ही देशांमध्ये



वाद आणि संघर्ष भडकू शकतो, असा इशारा जिनपिंग यांनी ट्रम्प यांना यावेळी दिला.

ट्रम्प आणि जिनपिंग यांनी आर्थिक सहकार्य वाढवणे आणि इराणला अण्वस्त्रे मिळवण्यापासून रोखण्यावर चर्चा केली. चिनी उद्योगांमध्ये अमेरिकन गुंतवणूक वाढवणे आणि अमेरिकन व्यवसायांसाठी चीनमध्ये बाजारपेठ खुली करणे यावरही चर्चा झाली. इराणला कधीही अण्वस्त्रे मिळू दिली जाणार नाहीत, यावर दोन्ही देशांचे एकमत झाले आहे.

हॉर्मुझ सामुद्रधुनीतून जहाजांच्या वाहतुकीला टोल आकारण्याच्या कोणत्याही प्रयत्नाला चीनचा विरोध असल्याचे जिनपिंग यांनी स्पष्ट केले. तसेच चीनने भविष्यात अमेरिकेकडून अधिक तेल खरेदी करण्याची तयारी दर्शवली आहे. ट्रम्प यांच्यासोबत 'एनव्हिडिया'चे जेन्सन हुआंग, 'ॲपल'चे प्रमुख टिम कूक, 'टेस्ला' आणि 'स्पेसएक्स'चे प्रमुख इलॉन मस्क आणि 'ब्लॅकरॉक'चे मुख्य कार्यकारी अधिकारी लॅरी फिंक यांसारखे दिग्गज अमेरिकन उद्योगपती उपस्थित होते. अमेरिकेच्या अध्यक्षांचा नऊ वर्षांतील हा पहिलाच चीन दौरा आहे.


---

# राखीव प्रवर्गातील उमेदवारांच्या खुल्या गटातील नियुक्तीला चाप

राज्य मंत्रिमंडळाचा महत्त्वपूर्ण निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – शासकीय सेवेसाठी स्पर्धा परीक्षांमध्ये वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परीक्षेस बसण्याची संधी या आधारे सवलत घेतलेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांच्या नियुक्तीबाबतच्या धोरणास गुरुवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या धोरणानुसार राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी वय,



शैक्षणिक पात्रता, अनुभव, परीक्षेस बसण्याची संधीमध्ये (परीक्षा शुल्क वगळून) शासनाने दिलेली सवलत घेतली असेल, अशा उमेदवारांची गणना संबंधित राखीव प्रवर्गातच करण्यात येईल. अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील पदांवर दावा करता येणार नाही, असे या धोरणात स्पष्ट करण्यात आले आहे.

तसेच राखीव प्रवर्गातील ज्या उमेदवारांनी निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परीक्षेस बसण्याची संधी (परीक्षा शुल्क ही बाब वगळून) या पात्रतेच्या निकषांमध्ये कोणतीही सवलत घेतलेली नाही, अशा उमेदवारांची निवड गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गातून करण्यात येणार आहे. या धोरणाचा फायदा गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गात निवड होणाऱ्या उमेदवारांना होणार आहे.

---

# आमदार यावलकरांच्या पुढाकाराने निर्माण होणार 'क्रीडा हब'

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज प्रवेशव्दाराचे आज लोकार्पण

**वरुड** – शहरातील क्रीडाप्रेमींसाठी आनंदाची बातमी असून शहरात आधुनिक सुविधांनी युक्त जलतरण तलावाची निर्मिती करण्यात आली असून या जलतरण तलावाच्या सभोवताल 'क्रिडा हब' ची निर्मिती केल्या जाणार आहे. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती कार्यक्रम व त्याचे औचित्य साधुन नगरपरिषदेच्या वतीने श्री छत्रपती संभाजी महाराज जलक्रिडा संकुल प्रवेशव्दाराची उभारणी करण्यात आली असून या उद्या या प्रवेशाव्दाराचे लोकार्पण लोकप्रिय आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांच्या उपस्थितीत होणार आहे.

याप्रसंगी नगराध्यक्ष ईश्वर सलामे, उपाध्यक्ष कविता उपरकर, मुख्याधिकारी गजानन भोयर, सार्वजनिक बांधकाम सभापती जीवन मालपे, शिक्षण सभापती प्राजक्ता चौधरी,



आरोग्य सभापती विनय खासबागे, पाणीपुरवठा सभापती अनिता पराते, नियोजन व विकास समिती सभापती पुष्पा पवार यांचेसह सर्व नगरसेवक, नगरसेविका उपस्थित राहणार आहेत.

जलतरण तलाव परिसरामध्ये 'क्रिडा हब' उभारण्याच्या हालचालींना वेग आला आहे. स्थानिक आमदारांच्या पुढाकारातून हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकारत असून, त्यामुळे वरुड परिसरात क्रीडा क्षेत्राला नवे बळ मिळणार आहे. या परिसरामध्ये क्रिडाशी संबंधित विविध प्रकारचे खेळ



खेळता यावे, याकरता ग्राऊंड आणि साहित्याची उपलब्धता करुन देण्यात येणार आहे. परिसरात विविध क्रीडा सुविधा विकसित करण्याचाही आराखडा तयार करण्यात येत असल्याने वरुड शहर 'क्रिडा हब' म्हणुन ओळख निर्माण करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांच्या संकल्पनेतून उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पामुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना मोठा फायदा होणार असून, त्यांना मोठ्या शहरांमध्ये जाऊन प्रशिक्षण घेण्याची गरज कमी होणार आहे. आधुनिक जलतरण तलावासोबतच व्यायामशाळा, मैदाने आणि इतर क्रीडा सुविधा उभारण्यावरही भर दिला जाणार असल्याची माहिती आरोग्य सभापती विनय खासबागे यांनी दिली.

---

# गावाच्या विकासाकरीता राष्ट्रसंतांच्या विचारांची गरज

ग्रामगीता प्रचारक ह.भ.प.राजु उमक यांचे प्रतिपादन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – गावाच्या विकासाकरीता राष्ट्रसंतांच्या विचारांची गरज ग्रामगीता ही पारायणासाठी नव्हे तर आचरणात आणण्याकरीता आहे. आजची पिढी व्यसनाधीन होत आहे. त्यामुळे दिवसें दिवस अडी अडचणी वाढत आहे अंधश्रद्धा, बेरोजगारी वाढल्यामुळे क्षणिक सुखाकडे नवीन पिढी धावत आहे. अशा अंधकारातुन दुर नेण्याकरीता गावाच्या विकासाकरीता राष्ट्रसंताच्या विचाराची गरज आहे, असे प्रतिपादन गुरुदेव सेवा मंडळाचे



अध्यक्ष व ग्रामगीता प्रचारक ह.भ.प.राजु उमक केले.

ते जरुड येथील मारुती देवस्थान येथे श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने आयोजित वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामजयंती महोत्सवात बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प.ग्रामगीताचार्य मीरा फुसे तर प्रमुख अतिथी म्हणुन माजी ज्युनियर कमिशन ऑफिसर आर्मी साहेबराव उपरकर, कृषी मार्गदर्शक रविंद्र गजभिये, माजी मुख्याध्यापक उल्हास तडस, ह.भ.प.संजय पडोळे, माजी सरपंच गणेश देशमुख, डॉ.सुधाकर पाटील उपस्थित होते. प्रथम राष्ट्रसंताच्या प्रतीमेचे पुजन पाहुण्यांचे हस्ते करण्यात आले. त्यानंतर खंजेरी भजनी मंडळ सुरुवात झली. त्यानंतर कार्यकर्ता सत्कारमुर्ती सुशिला जाने यांना शाल, राष्ट्रसंतांचा फोटो देवुन तर उल्हास तडस व गणेश देशमुख यांचा शाल व सन्मानपत्र तर राजु लाड, गजानन लवटे, वासुदेव बहुरुपी, मंदा बहुरुपी यांना शाल व ग्रामगीता देवुन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचा शेवटी राष्ट्र वंदनेने करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन दिलीप पाटील व आभार देवेंद्र धर्मे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता शंकर जावळे, पंढरी सातपुते, उमेश बाहे, गुलाब सोनटक्के, श्रीदेव पाटील, मंदा पडोळे, प्रभा माकोडे, ज्ञानेश्वर पाटील, विजय पाटील, हरिष शेलेकर, जितेंद्र पाटील, वासुदेव गायधने, योगेश बिसांद्रे, ज्ञानेश्वर अधव, बाबासाहेब अधव यांचेसह आदींनी परिश्रम घेत कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

# राखीव प्रवर्गातील उमेदवारांच्या खुल्या गटातील नियुक्तीला चाप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – शासकीय सेवेसाठी स्पर्धा परीक्षांमध्ये वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परीक्षेस बसण्याची संधी या आधारे सवलत घेतलेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांच्या नियुक्तीबाबतच्या धोरणास गुरुवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या धोरणानुसार राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परीक्षेस बसण्याची संधीमध्ये (परीक्षा शुल्क वगळून) शासनाने दिलेली सवलत घेतली असेल, अशा उमेदवारांची गणना संबंधित राखीव प्रवर्गातच करण्यात येईल.अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील पदांवर दावा करता येणार नाही, असे या धोरणात स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच राखीव प्रवर्गातील ज्या उमेदवारांनी निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परीक्षेस बसण्याची संधी (परीक्षा शुल्क ही बाब वगळून) या पात्रतेच्या निकषांमध्ये कोणतीही सवलत घेतलेली नाही, अशा उमेदवारांची निवड गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गातून करण्यात येणार आहे. या धोरणाचा फायदा गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गात निवड होणाऱ्या उमेदवारांना होणार आहे. या निर्णयामुळे गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गात निवड होणाऱ्या उमेदवारांबाबत स्पष्टता निर्माण होणार असून आरक्षणाच्या अंमलबजावणीत अधिक पारदर्शकता आणि सुसंगती येणार आहे. राज्य सरकारचे राखीव प्रवर्गातील उमेदवारांबाबतचे धोरण नसल्याची गंभीर दखल महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) घेत हे प्रकरण स्वतःहून दाखल करुन घेतले होते. तसेच निवड झालेल्या खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात याबाबत याचिका केली होती. त्यावर राखीव प्रवर्गातील उमेदवारांच्या नियुक्तीबाबतचे धोरण निश्चित करावे, असा आदेश न्यायालयाने दिला होता.

# विद्युत तारांच्या घर्षणामुळे राजुरा बाजार शिवारात आग : ३५ संत्रा झाडांसह साहित्याचे मोठे नुकसान

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरूड** – तालुक्यातील राजुरा बाजार परिसरातून एक संतापजनक घटना समोर आली आहे. मोजा राजुरा बाजार शेतशिवारात महावितरणच्या लोंबकळणाऱ्या विद्युत तारा तुटून पडल्याने भीषण आग लागली. या आगीत दोन शेतकऱ्यांच्या शेतातील ३५ फळझाडांसह लाखो रुपयांचे शेती उपयोगी साहित्य जळून खाक झाले



आहे. राजुरा बाजार येथील शेतकरी बाबाराव आण्याजी बहुरूपी आणि विठ्ठल अमझिरे यांची शेती मौजे राजुरा बाजार शिवारात आहे. या दोन्ही शेतकऱ्यांच्या शेतात फळधारेवर असलेली संत्राची बाग आहे. शेतातून गेलेल्या विद्युत तारा जुन्या आणि सैल झाल्याने अचानक तुटून खाली पडल्या. यावेळी झालेल्या तारांच्या घर्षणामुळे ठिणग्या पडून सुक्या कचऱ्याने पेट घेतला आणि पाहता पाहता आगीने रौद्र रूप धारण केले. संत्रा बागेला फटका: या आगीत दोन्ही शेतकऱ्यांची एकूण ३५ मोठी संत्रा झाडे पूर्णपणे जळून कोळसा झाली आहेत. साहित्याची राखरांगोळी: बाबाराव बहुरूपी यांच्या शेतातील ठिबक सिंचनाच्या नळ्या, स्प्रिंकलर सेट आणि इतर शेती उपयोगी महत्त्वाचे साहित्य आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.

'वर्षानुवर्षे पोटच्या पोराप्रमाणे जोपासलेली संत्रा झाडे डोळ्यादेखत जळताना पाहून आमचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. महावितरणच्या हलगर्जीपणामुळेच ही वेळ आली आहे.'

नुकसानग्रस्त शेतकरी भरपाईची मागणी या आगीमुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, त्यांचे वर्षभराचे उत्पन्न बुडाले आहे. संबंधित विभागाने तात्काळ या घटनेचा पंचनामा करून झालेल्या नुकसानीची योग्य भरपाई द्यावी, अशी आर्त हाक नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे केली आहे. आता महावितरण यावर काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# 'कायदा धाब्यावर बसवून सत्ता स्थापन, पक्ष फोडणे, आमदार खासदार फोडत असतील तर'

## राजू शेट्टींचा सीएम फडणवीसांवर हल्लाबोल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मुख्यमंत्री फडणवीस सगळा कारभारच जर नियम आणि कायदे धाब्यावर बसवून करणार असतील तर आम्ही शेतकरी आणि कष्टकरी जनतेच्या न्याय हक्कासाठी सविनय कायदेभंग केला तर चुकलं कुठं? अशा शब्दात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी मुख्यमंत्र्यांवर तोफ डागली आहे.

न्याय हक्कासाठी सविनय कायदेभंग केला तर चुकलं कुठं? शेट्टी यांनी ट्विट करत म्हटलं आहे की, कायदा धाब्यावर बसवून सत्ता स्थापन करणे, कायदा धाब्यावर बसवून पक्ष फोडणे, कायदा धाब्यावर बसवून आमदार –खासदार फोडणे, कायदा धाब्यावर बसवून राज्याचा कारभार चालविणे करणार असतील, तर कष्टकरी जनतेच्या न्याय हक्कासाठी सविनय कायदेभंग केला तर चुकलं कुठं? अशी विचारणा त्यांनी केली.

दरम्यान, मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून तोडगा काढण्याचे आश्वासन दिले असले तरीही आंबा व काजू बागायतदार आज १५ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी धडक देणारच असल्याची माहिती राजू शेट्टी यांनी दिली आहे.

# अंबरनाथमध्ये सेना–भाजप युतीवरुन अंतर्गत धुसफूस

## अवघ्या २४ तासांत नाराजी उघड!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – अंबरनाथमध्ये जाहीर झालेल्या शिवसेना (शिंदे गट) आणि भाजप युतीनंतर आता राजकारण चांगलेच तापले आहे. 'युती १०० टक्केच असायला हवी,' असे म्हणत शिवसेना शहरप्रमुख अरविंद वाळेकर यांनी या युतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे, पक्षाकडे स्पष्ट बहुमत असताना भाजपसोबत जाण्याची गरज काय? असा सवाल करत त्यांनी घरच्यांनाच लक्ष्य केले आहे. यामुळे अंबरनाथमधील युतीमध्ये सर्वकाही आलबेल नसल्याचे आता स्पष्ट झाले आहे. राज्यात महायुतीचे सरकार असले तरी स्थानिक पातळीवर मात्र अंबरनाथमध्ये शिवसेना आणि भाजपमध्ये मिठाचा खडा पडल्याचे चित्र आहे. गुरुवारी भाजप आणि शिवसेनेमध्ये झालेल्या बैठकीनंतर दोन्ही पक्षाच्या नेत्यांकडून जवळपास ९० टक्के युती झाल्याचे स्पष्ट झालं आहे. मात्र, दहा टक्के वरिष्ठांच्या आदेशानंतर युती अधिकृत होणार असल्याची पत्रकार परिषद घेऊन जाहीर करण्यात आले आहे.शिवसेना शहरप्रमुखांचा स्वपक्षीय नेत्यांवर निशाणा एकीकडे काँग्रेसमधून भाजपमध्ये सत्तेत बसण्यासाठी पक्षप्रवेश केलेले काँग्रेसच्या १२ नगरसेवकांनी युतीच्या बैठकीला दांडी मारत आपली नाराजगी व्यक्त केली तर दुसरीकडे शिवसेनेमधील काही नगरसेवक पत्रकार परिषदेतून निघून जात असल्याचे दिसले.

# जीवनाला उत्सव बनवणारा अवलिया!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** – प्रत्येकाला जीवनात आनंद हवा असतो पण तो मिळवायचा आणि टिकवायचा कसा हे मात्र समजत नाही. त्यासाठी कोणी मार्गदर्शक हवा असतो. माझ्या सुदैवाने तो मला २५ वर्षांपूर्वी लाभला आणि माझे जीवनच बदलून गेले. मी 'जीवन जगण्याची कला' अर्थात 'आर्ट ऑफ लिव्हिंग' शिकले. २००१ साली मी 'आर्ट ऑफ लिव्हिंग'चा पहिला कोर्स केला. तो सहा दिवसांचा होता, एकूण २० तास. पण तो केल्यावर मला जाणवले की वयाच्या ३६ व्या वर्षी माझा पुनर्जन्म झाला आहे.

चार वर्षांचा आजार बरा झाला त्या कोर्सच्या काळात माझी चार वर्षे साथ देणारी व्याधी अगदी सहज अदृश्य झालीच, पण त्याचबरोबर जीवनाची एक अवर्णनीय अनुभूति आली. आजवर कधीही न अनुभवलेला एक वेगळ्याच उच्च पातळीचा आनंद प्राप्त झाला. 'सुदर्शन क्रिया' केल्यावर स्वतःचे आणि एकूणच या जीवनाचे एक अभूतपूर्व दर्शन झाले. आणि त्यानंतर नियमित साधना आणि गुरुवचनांचा अभ्यास यामुळे सगळे आयुष्यच एका अद्भुत चमत्कारासारखे भासू लागले.

४५–७० उत्सव

एक अद्वितीय पर्वणी १९८१ मध्ये श्री श्री रवि शंकर यांनी आर्ट ऑफ लिव्हिंग ची स्थापना केली तेव्हा ते २५ वर्षांचे होते. आता २०२६ मध्ये १३ मे रोजी गुरूदेव ७० वर्षांचे होतील आणि संस्था ४५ वर्षांची. या केवळ ४५ वर्षांत गुरुदेवांच्या ध्येयासक्तीमुळे, दैवी शक्तीमुळे आणि अखंड परिश्रमांमुळे ही संस्था १८२ देशांमध्ये पसरलेली जगातील सर्वात मोठी सेवाभावी चळवळ आहे. कोट्यावधी लोकांनी गुरुदेवांच्या अतिशय व्यावहारिक आणि परिणामकारक ज्ञानाला आत्मसात करून आपले जीवन सहज, आनंदी आणि अद्भुत बनवले आहे.

**गेल्या आठ वर्षांत तुम्ही एमएसपीला हातच लावायला तयार नाही आणि साखर निर्यात बंदीने कारखाने**

# शेतकरी आणि कामगार पूर्णपणे कोलमडून पडले : हर्षवर्धन पाटलांनी अडचणींचा पाढाच वाचला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – 'साखर निर्यातीवर अचानक बंदी घालण्याचा निर्णय अनपेक्षित असून, यामुळे साखर कारखाने, शेतकरी आणि कामगार पूर्णपणे कोलमडून पडले आहेत,' अशा शब्दांत हर्षवर्धन पाटील यांनी नार आपली भूमिका मांडली. पाटील यांनी सांगितले की, गेल्या दोन–तीन महिन्यांत आंतरराष्ट्रीय युद्धाच्या परिस्थितीमुळे निर्यातीत अडचणी होत्या. मात्र, आता कुठे गती मिळत असतानाच बंदीचे नोटिफिकेशन आले. अनेक व्यापाऱ्यांनी कारखान्यांना ईएमडी दिली आहे, तर काहींनी ५० टक्के पेमेंटही केले आहे. या निर्णयामुळे हे सर्व व्यवहार अधांतरी झाले असून, साखरेचे व्यवहार थांबल्याने साठा पडून राहण्याची भीती निर्माण झाली आहे.

वीज निर्मितीबाबत नाराज 'को–जनरेशनचे (वीज निर्मिती) दर साडेसहा रुपयांवरून साडेचार रुपयांवर आणल्यामुळे वीज तयार करण्यापेक्षा बगॅस विकणे अधिक फायद्याचे ठरत आहे,' असे सांगत त्यांनी या धोरणाचा फेरविचार करण्याची मागणी केली.

साखर उद्योगाची आर्थिक स्थिती आणि थकबाकीची आकडेवारी साखर कारखानदारी संकटात येणे म्हणजे केवळ मालक अडचणीत येणे नव्हे, तर त्याचा थेट परिणाम शेतकरी आणि कामगारांवर होत आहे. पाटील यांनी महाराष्ट्रातील थकबाकीची भीषण आकडेवारी मांडली.

एफआरपी थकबाकी: ७००० कोटी रुपये (शेतकऱ्यांचे देणे). एचऑॅडटी पेमेंट: २००० कोटी रुपये (वाहतूकदारांचे देणे) पगार: ७०० कोटी रुपये (कामगारांचा पगार). 'शेतकऱ्याला आजच्या दरात ऊस पिकवणे परवडत नाही आणि कारखान्याला सध्याच्या उत्पन्नातून एफआरपी देणे शक्य नाही,' असे त्यांनी स्पष्ट केले. साखर उद्योगाला या संकटातून बाहेर काढण्यासाठी हर्षवर्धन पाटील यांनी राज्य सरकारकडे 'पॅकेज'ची मागणी केली. साखर उद्योगाला उभारी देण्यासाठी किमान विक्री मूल्य ४१०० रुपये करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

गेल्या आठ वर्षांपासून एमएसपी स्थिर असल्याने कारखाने तोट्यात आहेत. तसेच, ७५ हजार कोटींची गुंतवणूक झालेल्या इथेनॉल प्रकल्पांना ऊर्जितावस्था देण्यासाठी इथेनॉलच्या दरात ५ ते ७ रुपयांची वाढ करण्याची मागणी केली.

# नरेंद्र मोदींच्या आवाहनानंतर काही जण सायकलवर, काहीजण बैलगाडीने पोहोचले पालिकेत : तर पिंपरी चिंचवडच्या महापौरांनी परदेशी दौरा केला रद्द

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**पिंपरी चिंचवड** – पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद देण्यासाठी मुख्यमंत्र्यानंतर आता पिंपरी चिंचवडचे महापौर रवी लांडगे आजचं कामकाम सायकलवर करत आहेत. पण केवळ एक दिवस सायकल प्रवास करुन भागणार नाही, त्यामुळं आठवड्यातून एक दिवस सायकलवरून कामकाज करण्याचा निर्धार केला आहे. मी पदावर आहेत तोपर्यंत याचं अनुकरण करेल, असं महापौर म्हणालेत. सोबतच स्मार्ट सिटी अंतर्गत शेअरिंग सायकलची बारगळेलेली योजना नव्यानं सुरु करणार असल्याचं आणि प्रत्येक रस्त्यावर सायकल ट्रॅक उभारणार असल्याचं ते म्हणालेत. राष्ट्रवादीचे नगरसेवक बैलगाडीने पालिकेत पोहचले अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे तीन नगरसेवक थेट बैलगाडीने पिंपरी चिंचवड महापालिकेत दाखल झाले आहेत. आजच्या सर्व साधारण सभेला हजेरी लावताना पंतप्रधानांच्या आवाहनाला त्यांनी असा प्रतिसाद दिला आहे. मात्र महायुतीतील भाजप पालिकेत उधळपट्टी करुन पंतप्रधानांच्या आवाहनाला हरताळ फासत आहेत, अशी टीका या नगरसेवकांनी केली आहे. पिंपरीच्या महापौरांकडून परदेश दौरा रद्द पिंपरी चिंचवडचे अखेर महापौर रवी लांडगेंनी परदेश दौरा रद्द केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आवाहनाला साथ देत, देशहितासाठी हा अभ्यास दौरा रद्द करत असल्याचं त्यांनी जाहीर केलं आहे.

**नोकरी**

मिहान, ऑफिस, बँकींग, अर्धसरकारी प्रोजेक्ट साठी प्रत्येक जिल्हयात भरती. ऑपरेटर, सुपरवायजर, गार्ड, वर्कर, मॅनेजर

वय – १८ ते ३५

पगार – १५,००० ते ३५,००० कमवा

पुजा मॅडम ७७९६३८७१५६
७८८८०६९४५५

**Change Name**
**Old Name**
Mahindra Vishwanath Raut
**New Name**
Mahendra Vishwanath Raut
**Address :**
Tembhurkheda Road, Sai, Sangam Coloney, Ward No 1, Warud, Amravati, Maharashtra-444906

# नागरिकांसाठी ‘स्वर्ग रथ’ ठरतोय उपयुक्त : २ किमीची पायपिट थांबली

## केवळ सेवा शुल्क घेत दिल्या जातेय सेवा : अनेकांचा पुढाकार





■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरूड –** शहर व परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत असलेल्या ‘स्वर्ग रथ’ सेवेमुळे अनेक कुटुंबांना मोठा आधार मिळत आहे. एखाद्या व्यक्तीच्या निधनानंतर अंत्यविधीसाठी मृतदेह सन्मानपूर्वक स्मशानभुमीपर्यंत नेण्यासाठी ही सेवा अत्यंत महत्त्वाची ठरत असुन गरजु नागरिकांना याचा मोठा लाभ होत आहे.

‘स्वर्ग रथ’ ही संकल्पना सर्वप्रथम त्यावेळी प्रसिध्द वैद्यकीय तज्ञ डॉ.विजय देशमुख यांनी राबविली. त्याचे वडिल स्व.शरद देशमुख चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या नावाने असलेली रुग्णवाहिका त्यांनी शववाहिकेसाठी उपलब्ध करुन दिली आणि त्यानंतर ती वरुड व्यापारी संघाकडे ती सोपविली.

गेल्या काही दिवसांपासुन ही शववाहिका वरुड शहरात सेवा देत होती, आजपर्यंत १ हजारांपेक्षा जास्त पार्थीव या शववाहिकेने वाहून नेले आहेत, अशा स्थितीत केवळ १ शववाहिका असलेल्या वरुड शहरात अनेकदा अडचण निर्माण होत होती, एक पेक्षा जास्त अंत्ययात्रा असल्यास शववाहिका मिळत नव्हती, ही अडचण लक्षात घेता कृषि उत्पन्न बाजार समिती संचालक तथा शहरातील प्रसिध्द उद्योजक राजेश गांधी यांनी वरुड तालुका माहेश्वरी संघटनच्या पुढाकाराने त्यांचे वडिल राधाकिसनजी बल्लभदास गांधी यांच्या स्मृति प्रित्यर्थ शववाहिका लोकार्पित केली आणि शहरवासियांची मोठी अडचण दूर झाली. काही दिवसातच शहरातील प्रसिध्द सती माता / दुर्गा माता मंदीरने पुढाकार घेत एक शववाहिका शहरवासियांच्या सेवेत लोकार्पित केली आणि काही दिवसांपुर्वी आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांच्या पुढाकाराने शिवाजी नगर परिसरातील शिवाजी सार्वजनिक दुर्गा मंडळाला एक शववाहिका देण्यात आली, त्यामुळे आता वरुड शहरातील शववाहिकांची संख्या ४ वर पोहचली आहे.

विशेष म्हणजे या चारही शववाहिका या सेवा तत्त्वावर कार्यरत आहे, केवळ त्याला लागणारे डिझेल आणि चालकाला दिल्या जाणारी रक्कम एवढेच स्विकारल्या जाते, त्यातही ज्याच्या घरी मृत्यू झाला त्याची आर्थीक स्थिती जर जेमतेम असेल आणि त्याचे कुटूंबियांकडून ती रक्कम देणे होत नसेल तर जी दिली ती रक्कम सुध्दा स्विकारुन पार्थीव स्मशानभुमीमध्ये पोहचविल्या जाते.

वरुड शहरात केदारेश्वर मोक्षधाम आणि न.प.मोक्षधाम अशा केवळ दोनच स्मशानभुमि आहेत. यापुर्वी किमान २ किलोमिटर किंवा त्यापेक्षा अधिक पार्थीवाला खांद्यावरुन वाहून न्यावे लागत होते, एवढेच नव्हे तर या अंत्ययात्रेमध्ये सहभागी झालेल्या स्वकीय, आप्तेष्ट, नातेवाईक आणि शहरवासियांना सुध्दा तेवढेच पायदळ जावे लागत होते, त्यामुळे ऊन, वारा, पाऊस झेलावा लागत होता परंतु शववाहिकेमुळे आता सोबतच्या लोकांना आपआपल्या वाहनाने मोक्षधाम गाठता येतो, त्यामुळे एकंदरीत शववाहिकेमुळे केवळ मृतदेहाचीच सोय झाली असे नव्हे तर स्वकीय, आप्तेष्ट, नातेवाईक आणि शहरवासियांची मोठी साय झाली आहे. पूर्वी अंत्ययात्रेसाठी वाहन उपलब्ध करण्यात अनेक अडचणी येत होत्या. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांना आर्थिक व वाहतुक समस्यांचा सामना करावा लागत होता. मात्र ‘स्वर्ग रथ’ सेवा सुरू झाल्यापासुन नागरिकांना तातडीने आणि कमी खर्चात सुविधा उपलब्ध होत आहे. या सेवेमुळे दुःखाच्या प्रसंगी कुटुंबियांची धावपळ कमी झाली असून, मृत व्यक्तीला सन्मानाने अंतिम निरोप देता येत आहे. सामाजिक बांधिलकी जपत सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाचे वरुड शहरासह तालुक्यातील नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे.

नागरिकांनीही या सेवेला समाजासाठी अत्यंत उपयुक्त उपक्रम असल्याचे सांगत, भविष्यातही अशीच सेवा सातत्याने सुरु ठेवण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

**स्वर्ग रथामुळे वरुडवासीयांना मोठा दिलासा**

वरुड शहर व तालुक्यातील काही गावांमध्ये ‘स्वर्ग रथ’ सेवा सुरू झाल्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळत असून, अंत्यविधी व्यवस्थेत मोठी सोय झाली आहे. यापूर्वी अनेक गावांमध्ये रस्त्यांची व वाहनांची सुविधा नसल्याने पार्थिव किमान २ किलोमीटर किंवा त्यापेक्षा अधिकपर्यंत खांद्यावर घेऊन पायदळ न्यावे लागत होते. त्यामुळे नातेवाईक व ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

विशेषतः पावसाळ्यात किंवा दुर्गम भागात अंत्ययात्रा नेणे अत्यंत कठीण ठरत होते मात्र, ‘स्वर्ग रथ’ सेवा उपलब्ध झाल्यानंतर पार्थिव सन्मानपूर्वक आणि वेळेत स्मशानभूमीपर्यंत पोहोचविणे शक्य होत आहे. या सेवेमुळे दुःखाच्या प्रसंगी कुटुंबीयांची होणारी धावपळ आणि मानसिक ताणही कमी झाला आहे.

सामाजिक भावनेतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाचे वरुडवासीयांकडून स्वागत करण्यात येत असून, ‘स्वर्ग रथ’ ही सेवा अनेक गरजू कुटुंबांसाठी आधारवड ठरत आहे.

### शववाहिकेकरीता संपर्क

| | | |
|---|---|---|
| दुर्गा माता मंदीर | मयूर तडस | ९४२०७२१४२८ |
| बाजार समिती | रविंद्र टेकाडे | ८६०५०९७१३० |
| व्यापारी संघ | सुनिल अढाऊ | ९४२२९१७६९७ |
| | रवि यावलकर | ९४२२१५७०५७ |
| शिवाजी दुर्गा | शशिकांत खेरडे | ८०५५८७५१०१ |

### शववाहिकेमुळे सर्वसामान्यांची मोठी सोय : गिरीधर देशमुख



“ वरुड शहरात उपलब्ध झालेल्या शववाहिका सेवेमुळे सर्वसामान्य नागरिकांची मोठी सोय झाली आहे, यापूर्वी अनेक वेळा अंत्यविधीसाठी वाहन उपलब्ध होत नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. काही ठिकाणी पार्थिव खांद्यावर घेऊन पायदळ जावे लागत असल्याने नातेवाईकांची मोठी गैरसोय होत होती. मात्र, शववाहिका सेवा सुरू झाल्यानंतर नागरिकांना वेळेत आणि सन्मानपूर्वक सुविधा उपलब्ध होत आहे.

ही सेवा सामाजिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची असून, दुःखाच्या प्रसंगी गरजू कुटुंबांना मोठा आधार मिळत असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच अशा लोकहिताच्या उपक्रमांना समाजातील सर्व घटकांनी सहकार्य करावे, असे आवाहन वरुड व्यापारी संघाचे अध्यक्ष गिरीधर देशमुख यांनी व्यक्त केली.



“ गरजू आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी शववाहिका ही अत्यंत उपयुक्त सुविधा ठरत आहे. पूर्वी अनेकांना पार्थिव वाहून नेण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. आता ही सुविधा उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांची गैरसोय दूर झाली असून दुःखाच्या प्रसंगी मोठा आधार मिळाला आहे. सामाजिक बांधिलकी जपत सुरू करण्यात आलेला हा उपक्रम राबविण्याची संधी आम्हाला मिळाली, ही आमच्या साठी अभिमानाची बाब आहे, अशी प्रतिक्रिया कृषी उत्पन्न बाजार समिती अध्यक्ष राजेश गांधी यांनी व्यक्त केली.



“ मानवतेच्या दृष्टिकोनातून सुरू करण्यात आलेली शव वाहिका सेवा कौतुकास्पद आहे. सर्वसामान्य व गरजू कुटुंबांना याचा निश्चितच फायदा होणार आहे, सामाजिक बांधिलकी जपत सुरु करण्यात आलेली ही सेवा अत्यंत महत्त्वाची आहे. दुःखाच्या क्षणी नागरिकांना आधार देणारा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी आहे, अशी प्रतिक्रिया आमदार चंदू उर्फ उमेश यावलकर यांनी दिली.

# विजय थलपती यांनी पीएम मोदींना लिहिलं पहिलं पत्र

## तामिळनाडूचे मुख्यमंत्री होताच मोठी मागणी



■ (प्रतिनिधी वरूड दर्पण)

**चेन्नई –** तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना कापसावरील ११ टक्के आयात शुल्क तात्काळ हटवण्याचे आवाहन केले. वाढत्या कच्च्या मालाच्या किमतींमुळे राज्यातील वस्त्रोद्योग आणि तयार कपड्यांचे क्षेत्र गंभीर संकटाचा सामना करत असल्याचं विजय थलपती नरेंद्र मोदींना लिहिलेल्या पत्रात नमूद केले.

पंतप्रधान मोदी यांना लिहिलेल्या पत्रात मुख्यमंत्री विजय यांनी म्हटले आहे की, कापूस आणि सुताच्या किमतीत झालेल्या प्रचंड वाढीमुळे वस्त्र उत्पादकांवर प्रचंड दबाव आला आहे आणि या क्षेत्रावर अवलंबून असलेल्या लाखो कामगारांच्या उपजीविकेला धोका निर्माण झाला आहे.

तामिळनाडू हा भारतातील सर्वात मोठा वस्त्रोद्योग आणि तयार कपड्यांचा निर्यातदार असल्याचे वर्णन करून, मुख्यमंत्र्यांनी पुढे म्हटले की, हा उद्योग लाखो लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार पुरवतो. कापूस आणि सुताच्या किमतीत झालेल्या अभूतपूर्व वाढीमुळे तामिळनाडूचा वस्त्रोद्योग आणि तयार कपड्यांचा उद्योग गंभीर संकटाचा सामना करत आहे, असं विजय थलपती यांनी सांगितले.

गेल्या दोन महिन्यांत कापसाच्या भावात २५ टक्क्यांनी वाढ– मुख्यमंत्री विजय यांनी पुढे म्हटले आहे की, सदर दरवाढ प्रामुख्याने देशांतर्गत कापूस उत्पादनातील घट आणि देशभरातील वाढलेल्या व्यापारामुळे झाली आहे, ज्यामुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे आणि वस्त्र उत्पादकांवर परिणाम झाला आहे. कच्च्या मालाचा स्थिर पुरवठा आता केवळ आयातीद्वारेच सुनिश्चित केला जाऊ शकतो, परंतु कापसावरील सध्याचे ११ टक्के आयात शुल्क आयातीला महाग आणि उद्योगासाठी तोट्याचे बनवत आहे. गेल्या दोन महिन्यांत कापसाचा भाव ५४,७०० रुपयांवरून ६७,७०० रुपये प्रति कँडीपर्यंत वाढला आहे, ही सुमारे २५ टक्क्यांची प्रचंड वाढ आहे.

# प्रेमसंबंधाच्या रागातुन तरुणावर विटांनी हल्ला

## कुऱ्हाडीने मारण्याची दिली धमकी : शें.घाट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

■ (प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरुड –** बहिणीसोबत असलेल्या प्रेमसंबंधाच्या रागातुन दोन जणांनी एका तरुणाला मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी शेंदुरजनाघाट पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास सुरु केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी मयुर दिलीपराव अतकरे (३३), रा.मालखेड याचेसोबत आरोपीच्या बहिणीचे प्रेमसंबंध आहेत. याच कारणावरुन आरोपी आणि त्याचे मामा फिर्यादी मयुरचा राग करत होते. घटनेच्या दिवशी आरोपीच्या बहिणीने फिर्यादी मयुरला मेसेज करुन घरी बोलावले होते. त्यानुसार फिर्यादी मयुर हा आरोपीच्या घरासमोर गेला असता बहिणीशी संवाद साधण्याचा प्रयत्न करत होता.

फिर्यादी मयुर तिथे पोहोचताच रागाच्या भरात असलेल्या आरोपींनी त्याच्यावर हल्ला चढवला. आरोपी अमर पांडुरंग हरले (२६) रा.मालखेड याने फिर्यादी मयुरच्या डोक्यावर उजव्या बाजुने वीट मारली ज्यामुळे डोक्याला दुखापत होऊन रक्तस्राव झाला तर आरोपी दिपक ज्ञानेश्वर डबरासे, रा.मालखेड याने फिर्यादी मयुरच्या उजव्या खांद्यावर वीट मारुन त्याला जखमी केले. मारहाणीनंतर दोन्ही आरोपींनी फिर्यादीला अश्लील भाषेत शिवीगाळ केली. एवढेच नव्हे तर कुऱ्हाडीने मारुन टाकु, अशी जीवे मारण्याची धमकीही दिली.

या प्रकरणी फिर्यादी मयुर दिलीपराव अतकरे (३३), रा.मालखेड यांचे तक्रारीवरुन शेंदुरजनाघाट पोलिसांनी दोन्ही आरोपी आरोपी अमर पांडुरंग हरले (२६) व दिपक ज्ञानेश्वर डबरासे, दोन्ही रा.मालखेड, याचेविरुद्ध मारहाण आणि धमकी दिल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली शेंदुरजनाघाट पोलिस करत आहेत.

